# महाराष्ट्र शासन

## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण

१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. शिससं/उशि/पुवि/२०२०-२१/महाडीबीटी/3284 दिनांक : ०९.०९.२०२१

**तात्काळ/अत्यंत महत्वाचे**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.

४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**विषय : - अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना भाग २ या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत...**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/ शिष्य २०२०-२१/डीबीटी/१००४६ दि. ०८.०८.२०२१.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, राज्यशासनाच्या महाडीबीटी पोर्टलवरुन उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. **ज्यामध्ये अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना भाग २ या योजनाचाही समावेश आहे. सदर योजनेचे शासन निर्णय व माहिती महाडीबीटी पोर्टल तसेच संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

अल्पसंख्यांक विकास विभागाचा शासन निर्णय दि. १४ ऑक्टोबर, २०११ अन्वये अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजना भाग २ या योजनेसाठी एकूण २००० संच निर्धारित केले आहेत. तथापि सदरहू निर्धारित संच पूर्ण होत नसल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे सदर शिष्यवृत्तीसाठी निर्धारित संच पूर्ण होण्याकरीता विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करावे.

**सदर शिष्यवृत्तीसाठी महाडीबीटी पोर्टलवरुन सन २०१९-२० करीता ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज भरलेले आहेत, तथापि त्रुटीपूर्ततेसाठी सदरहू अर्ज विद्यार्थ्यांना त्यांचे लॉगीनवर परत पाठविलेले आहेत, अशा अर्जांचे Re-Aply करणेसाठी दि. १५.०९.२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच सन २०२०-२१ करीता ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापही अर्ज भरलेले नाहीत, अशा विद्यार्थ्यांना अर्ज भरणेसाठी दि. ३०.०९.२०२१**

**पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. यापुढे मुदतवाढ देण्यात येणार नसून, पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी मुदतीमध्ये अर्ज भरणेसाठी सर्व महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांना कळविण्यात येत आहे.**

**(डॉ. किरणकुमार बोंदर)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत :- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.